स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक **14–11–2011** रोजी दुपारी **03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 3. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 4. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 5. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 6. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 7. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 8. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 9. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 10. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 11. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 12. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 13. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 2. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 3. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. संजीव जयसवाल, आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 122 :</u>– पोलिस लाईन टाकळी येथील तलावाचे सौंदर्यीकरण व विकास करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. 30,00,000/– चे प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच या कामाकरिता वास्तुशिल्पकार विस्तार कन्सल्टंट यांची वास्तुशास्त्रज्ञ म्हणून म.न.पा.च्या निर्धारित दरावर नेमणुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 123:</u>– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम.आय.डी.सी. हिंगणा करिता डांबर बी.पी.सी.एल./आय.ओ.सी.एल./एच.पी.सी. एल. रिफायनरीज मुंबई कडुन डांबर वाहतूक करण्याच्या कामाकरिता रु. 39,91,600.00 राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलाविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 124 :</u>– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाकरीता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याकरिता रु. 89,64,400/– राशीचे प्रकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व तद्नंतर निविदा बोलाविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 125 :</u>– नागपूर महानगरपालिका नविन जकात भवन संत्रा मार्केट स्थित या भवनाचे उर्वरित बांधकाम, इमारतीचे इंटेरिअर व फर्निचर च्या प्राकलनिय अंदाजित रक्क्म रु. 77,75,163/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करणे. या वित्तीय वर्षी सन 2011–2012 अंतर्गत पद क्र. 575 अंतर्गत प्रावधान उपलब्ध असल्यामुळे या कामाची निविदा बोलविण्यास मंजूरी प्रदान करणे. या कामाकरिता मे. व्हि.के. असोसिएट्स यांना म.न.पा. चे पूर्व नियोजीत निश्चित केलेल्या दराप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 126 :</u>– नागपूर महानगरपालिकेच्या वर्धा रोड स्थित जकातनाका क्र. 8 चा आधुनिकीकरण व विस्तारिकरणाचा प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाची अंदाजीत रक्कम रु. 16,31,70,014/– च्या ढोबळ प्राकलनास मंजूरी प्रदान करणे. या वित्तीय वर्ष 2011–2012 अंतर्गत पद क्र. 575 चुंगीनाका चेकपोस्ट निर्माण व जकात भवन निर्माण मध्ये रु. 3.00 कोटीचे प्रावधान उपलब्ध असल्यामुळे तसेच टप्प्या टप्प्याने हा प्रकल्प उभारावयाचा असल्यामुळे प्रथम चरणात रु. 3.00 कोटी (रु. तिन कोटी) प्रथम टप्प्याचे बांधकामाकरिता निविदा बोलाविण्यास मंजूरी प्रदान करणे. या कामा करिता मे. व्ही.के. असोसिएट्स यांना म.न.पा. चे प्रचलित दरा

प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 127</u>:— नागपूर शहर स्वच्छ व सुदंर ठेवण्याकरीता नागरीक, दुकानदार, व्यवसायी, पान ठेले इत्यांदीनी रस्त्यावर किंवा बाहेर कुठेही कचरा टाकाऊ बांधकाम साहीत्य वगैरे टाकु नये व परिसरात स्वच्छता ठेवण्याच्या दृष्टीने नविन 72 प्रभागाकरिता एकूण 72 नागरी पोलिस व त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता 11 सुपरवायझर यांना अनुक्रमे रुपये 10000 व रुपये 11000/— मासीक पारीश्रमीकावर 12 महीण्यांकरीता कंत्राटी पध्दतीवर लावण्याचा व त्यावर खर्च होणाऱ्या अंदाजे रुपये 1 कोटी पद क्र. 172 मधुन करण्याचा तसेच नागरी पोलिसांनी त्यांना देय असलेल्या पारिश्रमीकापेक्षा दुप्पट रक्कम वसुल केल्यास त्यांना एकुण वसूल केलेल्या रकमेच्या 10 टक्के रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 128</u> :— वार्ड क्र. 79 सुभाष रोड ते डालडा फॅक्ट्री चौका पर्यन्त रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 27,63,950/— च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघु निविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 129</u> :— वार्ड क्र. 15 के.टी. नगर फ्रेन्डस् कॉलनी, काटोल रोड येथे नक्षत्र रिक्रीएशन ग्राऊंडचे निर्माण करण्यास्तव येणाऱ्या प्रस्तावित रु. 98,68,000/— एकत्रित प्राकलनास प्रशासकीय तसेच या कामास्तव मे. डिझायनर इनकारपोरेशन यांची या कामाकरिता म.न.पा. चे निर्धारित दरावर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंसलटंट म्हणून नियुक्त करण्यास व निविदा काढण्यास मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघु निविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 130</u> :— आंबाझरी उद्यानाचा विकास बी.ओ.टी. धर्तीवर करण्याकरिता बी.ओ.टी. ऑपरेटर कडे हे उद्यान विकास, संचलन, देखभाल व व्यवस्थापनाकरिता प्रस्ताव आमंत्रीत करण्यासाठी Request for proposal-RFP मधील खालील ठळक नमुद वित्तीय व प्रशासकीय बाबींना तसेच Request for proposal-RFP ला त्यातील नमुद असलेल्या अटी शर्तीसह मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा प्रकाशित करण्यासह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच महानगरपालिकेच्या मंजूरी करीता सभागृहा कडे पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. बी.ओ.टी. ऑपरेटर कडे हे उद्यान जास्तीत जास्त 25 वर्षांकरिता उद्यानाचा विकास, संचलन, देखभाल व व्यवस्थापनाकरिता सोपविण्यात येईल.
2. उद्यान व जागेची मालकी महानगरपालिकेची राहील.
3. या करिता कंपनी, पार्टनरशिप फर्म व प्रायव्हेट लि.फर्म्स कडून Request for proposal-RFT मागविण्यात येईल.
4. Request for proposal-RFT सादर करतांना इच्छुक कंपनी व फर्मसना रु. 140.00 लक्षा चे वर One Time Fixed Premium नमूद करावी लागेल.
5. रु. 56.00 लक्ष Variable Payment दरवर्षी म.न.पा. ला दयावे लागेल व यात दर तीन वर्षाने 10 टक्के वाढ करण्यात येईल.
6. क्लब हाऊस सदस्य फी पासून होणाऱ्या मिळकतीच्या 20 टक्के रक्कम महानगरपालिकेला प्राप्त होईल. क्लब हाऊस सदस्य संख्या व फी ची रक्कम निश्चित करण्याकरिता मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत येणाऱ्या समितीत बी.ओ.टी. ऑपरेटर सुध्दा सदस्य राहतील.

<u>ठराव क्रमांक 131 :</u>– नागपूर शहरात विविध ठिकाणी पादचारी पुल **(Foot Over Brodge)** उभारण्याबाबत / सुधारित प्रस्ताव.

नागपूर शहर ही महाराष्ट्राची उपराजधानी असून ही संत्रा नगरी या नावानी सुप्रसिध्द आहे. तसेच नागपूर शहरातील लोकसंख्या सध्यास्थितीत जवळ – जवळ 25.00 लक्ष इतकी आहे. हयामुळे नागपूर शहरातील वाढती वाहतूक व अपघाताचे सुध्दा प्रमाण वाढलेले आहे. नागपूर महानगर पालिके द्वारे पादचा–यांच्या सोयीकरिता नागपूर शहरात खाजगी सहभाग तत्वाद्वारे विविध ठिकाणी (Foot Over Brodge) उभारण्याच्या प्रस्ताव सन 2010 – 11 च्या या वार्षिक अर्थसंकल्पात आखलेला होता. आखलेल्या योजने अंतर्गत नागपूर शहरातील वेगवेगळया रस्त्यावर व चौरस्त्यावर जवळ–जवळ 18.00 मीटर व त्यापेक्षा जास्त रूंदीच्या रस्त्यावर 22 ठिकाणी पादचारी पुल बांधण्याचे प्रस्ताव आहे.

या अगोदर सन 2010 – 11 या वार्षीक अर्थसंकल्पात 21 नं. फुटवोअर ब्रिजच्या कामाची तरतुद करण्यात आलेली होती. कामाकरिता विषय विचारात घेण्याकरिता मा. स्थायी समिती पूढे ठेवण्यात आलेले होते. स्थायी समितीने वरिल कामाकरिता व निविदा बोलविण्याकरिता मान्यता प्रदान केलेली होती. परंतू या कामामध्ये काही तांत्रीक बाबी, जागाबाबत व कॅश फ्लोचा मुद्दा या कारणामुळे निविदा प्रक्रिया स्थगीत ठेवण्यात आली. या वरिल बाबीमुळे आज पावेतो काम झालेले नाही. तरी या आर्थिक संकल्पात 2011 – 12 फुटवेअर ब्रिज बांधण्याकरिता मागील कारणे लक्षात घेता म.न.पा. च्या पॅनलवर असलेले मेसर्स मोनार्च सर्वेअर ॲण्ड इंजिनिअरिंग प्रा. लि. पुणे यांच्या द्वारे फुटवेअर ब्रिज बांधण्याकरिता नागपूर शहरातील विविध ठिकाणचे स्थळ सर्वे, तांत्रीक बाबी डिटेल ड्रॉईंग, कॅश फ्लो या सर्व बाबीचा अभ्यास करून नविन निविदा काढण्याचे प्रस्तावित आहे.

<u>22 **No-** ठिकाण खालील प्रमाणे आहे.</u>

1. अजनी स्टेशन
2. मेडीकल चौक
3. राजीव गांधी चौक
4. साई मंदिर (वर्धा रोड)
5. छत्रपती चौक (सायकल स्टॅण्ड)
6. खामला चौक
7. सिटी बस स्टॅण्ड
8. मोहीनी कॉम्प्लेक्स
9. एल. आय. सी. कॉम्प्लेक्स
10. मेयो हॉस्पिटल
11. अग्रेसन चौक
12. गांधी पूतला (सेंट्रल एव्हेन्यु रोड)
13. आकाशवाणी चौक
14. लोकमत चौक(मिडास)
15. शंकरनगर चौक
16. हॉटेल नैवेद्यम (झांसी राणी चौक)
17. मोरभवन
18. लॉ कॉलेज चौक (जि.एस. कॉलेज जवळ)
19. एस. एफ. एस. स्कुल (गड्डीगोदाम)
20. इंदोरा चौक (कामठी रोड)
21. आनंद भंडार (काटोल रोड)
22. रिझर्व बँक चौक

सदर पादचारी पुलावर म.न.पा.च्या out door Advt- policy प्रमाणे , उद्योजकाला Advt right देवुन, पादचारी पुलांचे काम (DBFOT) Design Built Finance Operate & Transfer म्हणजे खाजगीकरण तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. खाजगीकरण तत्वावर निविदा बोलाविणेचा प्रस्ताव विचारात घेणे, तसेच सदर कामाचे प्रारूप बनविणे, निविदा बनविणे व प्रकल्प संचालन करण्याचे काम म.न.पा. चे पॅनलवर असलेले मेसर्स मोनार्च सर्वेअर ॲण्ड इंजिनिअरिंग प्रा. लि. पुणे यांना म.न.पा. च्या प्रचलित दराप्रमाणे देण्याचा प्रस्ताव विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघू निविदा काढण्यासह विषयात खालील स्थळांचा अंर्तभाव करुन विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

23 विटणविसपूरा पार्क चौक
24. रेशीमबाग चौक (लोकांची शाळा)
25. अशोक चौक

<u>ठराव क्रमांक 132 :–</u> नागपूर शहरातील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या खांबांवरील (म.रा.वि.वि.कं.च्या खांबांवरील दिव्यांचा समावेश

नसलेल्या सर्कीटस्पैकी) २५० वॅट व १५० वॅट हायप्रेशर सोडीयम व्हेपर पथदिवे १०० वॅट ते २०० वॅट इंडक्शन पथदिव्यांनी 'बिओटी' तत्वावर बदलणे व या पथदिव्यांच्या यंत्रणेतील आवश्यक केबल्स्, खांब, स्विच गियर बॉक्सेस् बदलणे-अपग्रेड करणे (स्विच गियर बॉक्सेस्) व याकरीता येणाऱ्या खर्चाची पाच वर्षांच्या काळात सव्याज परतफेड करणे तसेच संपूर्ण काळात ('बिओटी तत्वावर इंडक्शन लॅम्प्स् बसविणे व इतर आवश्यक कामावरील खर्चाची सव्याज परतफेड करावयाचा कालावधी') या पथदिव्यांची व बदलविण्यात आलेल्या पथदिव्यांच्या साहित्यातून (शक्यतो) हायमास्ट वरील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करणे या कामावरील खर्च –

अ) केबल्स्, खांब बदलविणे व फिडर्स अपग्रेड करणे /बदलविणे या कामाची एकुण राशी रु. ३९.४ कोटी (पाच वर्षांच्या काळात द.सा.द.शे. १०.७०% व्याजाचा विचार करता अपेक्षीत परतफेडीची रक्कम रु. ५२.०५ कोटी होते.)

[या कामाकरीता परतफेडीच्या कमीत कमी रकमेची मागणी करणाऱ्या निविदाकाराची निवड करण्यात येईल]

ब) बिओटी तत्वावर इंडक्शन लॅंपस् फिटींग्ज्नी २५० वॅट व १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग्ज्

बदलविणे (या एकुण पथदिव्यांची संख्या १९५९९ असून हे पथदिवे इंडक्शन लॅंप फिटिंग्ज्ने बदलविण्याचा अपेक्षीत खर्च रु. ३५.६५ कोटी आहे) व उर्जा बचतीतून अपेक्षीत दहा वर्षांच्या काळामधे (सध्या प्रचलीत दरानुसार) या रकमेची परतफेड करणे. (उर्जा बचतीची वार्षीक रक्कम रु. ४.६५ कोटी होते.)

[या कामाकरीता उर्जा बचतीच्या रकमेची कमीत कमी मागणी करणाऱ्या निविदाकाराची निवड करण्यात येईल.]

क) वर नमूद पथदिव्यांची 'बांधा वापरा हस्तांतरीत करा' (BOT) च्या काळामधे (दहा वर्षांच्या काळामधे) देखभाल दुरुस्ती करणे. (सध्या अस्तित्वात असलेल्या या दिव्यांची देखभाल दुरुस्ती व साहित्यावरील वार्षीक खर्च रु. १.५ कोटी अपेक्षीत आहे.)

[या कामाकरीता कमीत कमी दर देणाऱ्या निविदाकाराची निवड करण्यात येईल.]

'अ', 'ब' व 'क' करीता दिलेल्या दरांचे एकत्रीत रित्या विश्लेषण करुन सर्वात कमी दर देणाऱ्या निविदाकारास हे काम देण्यात येईल, व स्थायी समितीच्या मंजूरीने मा. समागृहाकडे प्रस्ताव पाठवून मा.सभागृहाच्या मंजूरीनंतर या कामास्तव निविदा बोलविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेउन म.न.पा.तील या पूर्वीचे "व्हायब्रंट" चे कामाचा पुर्वानुभव बघता अनुभवी कंत्राटदाराकडुन E.M.O. डी.डी. चे स्वरुपात घेण्यांत यावी तसेच सिक्युरीटी डिपॉझिट देखील 50% बॅक गॅरंटीचे स्वरुपात जमा करुन घ्यावे. तसेच Energy Saving द्वारे परत फेड करण्याच्या कालावधीची निविदाकाराद्वारे स्पष्टता असावी. तसेच निविदा प्रकाशित करुन सभागृहाची मंजूरी मिळाल्यानंतरच निविदा उघडण्यात यावी या सुचनेसह समितीने विषयास **एकमताने मंजूरी प्रदान केली.**

**<u>ठराव क्रमांक 133</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर